**L. A. BILL No. LXXV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५.**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;



(शा.म.मु.) एचबी-०७४३–१ (१०४५–७-२०२५)

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५, यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २५ जून २०२५ रोजी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता;

२०१५ चा महा. २८.

२०२५ चा महा. अध्या. ६.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्योदशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे;
**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २५ जून २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २ मधील, खंड (ढ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :–

२०१५ चा महा. २८.

"(ढ) "अनिवासी भारतीय (एनआरआय)" याचा अर्थ, जी व्यक्ती, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, "सर्वसाधारण रहिवासी नाही" आणि त्यानुसार जिला, विदेशातील भारतीय राजदूतावासाकडून किंवा केंद्राकडून अनिवासी भारतीय प्रमाणपत्र देण्यात आले आहे ती व्यक्ती, असा आहे आणि त्यात, पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, तिच्या बालकाचा किंवा पाल्याचा समावेश होतो;".

१९६१ चा ४३.

१८९० चा ८.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

२०२५ चा महा. अध्या. ६.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद केली आहे.

२. या अधिनियमामध्ये, इतर गोष्टींबरोबरच, अनिवासी भारतीय (एनआरआय) कोट्याअंतर्गत व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रमांमध्ये प्रवेशासाठी जागांचे वाटप करण्याची तरतूद केली आहे. उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ढ) मध्ये "अनिवासी भारतीय (एनआरआय)" या संज्ञेची व्याख्या केली आहे.

३. खरे अनिवासी भारतीय उमेदवार, महाराष्ट्र राज्यातील अनिवासी भारतीय (एनआरआय) कोट्याअंतर्गत व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रमांमध्ये प्रवेश मिळविण्याच्या संधीपासून अनेकदा वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले होते. म्हणून, उक्त अधिनियमातील अनिवासी भारतीय (एनआरआय) या संज्ञेच्या व्याख्येत सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटले, जेणेकरून ही व्याख्या, पी. ए. इनामदार या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या कायद्याशी सुसंगत असावी, ज्यामध्ये असे देखील प्रतिपादन केले आहे की,–

"जे लोक इतर देशांमध्ये स्थलांतरित झालेले आहेत, त्या भारतीय वंशाच्या लोकांची, त्यांच्या मुलांना त्यांच्या स्वतःच्या देशात राहून केवळ शिक्षणच मिळत नाही तर, भारतीय सांस्कृतिक मूल्यांशीदेखील ते पुन्हा जोडले जात असल्याने, त्यांच्या मुलांना त्यांच्या स्वतःच्या देशात परत आणण्याची इच्छा असते. त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर ते इतरत्र खर्च करणार असलेला पैसा त्यांच्या स्वतःच्या मातृभूमीपर्यंत पोहोचावा अशी-देखील त्यांची इच्छा असते. आमच्या मते, १५% पेक्षा अधिक नसलेले अशा जागांचे मर्यादित आरक्षण, दोन शर्तींच्या अधीन राहून व्यवस्थापनाच्या स्वेच्छानिर्णयानुसार, अनिवासी भारतीयांना (एनआरआय) उपलब्ध करून देता येईल. प्रथम, अशा जागांचा वापर केवळ अनिवासी भारतीयांना (एनआरआय) आणि त्यांच्या मुलांसाठी किंवा पाल्यांसाठी प्रामाणिकपणे झाला पाहिजे. दुसरे म्हणजे, या कोट्यात, गुणवत्तेला पूर्णपणे फाटा देऊ नये.".

४. २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्यातील विविध व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होईल. म्हणून, उक्त अधिनियमामध्ये तात्काळ सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटले.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २५ जून २०२५ रोजी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. ६), हा प्रख्यापित केला होता.

६. उक्त अध्योदशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३ जुलै, २०२५.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

# सन २०२५ चे वि. स. वि. क्र. ७५-महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) सुधारणा विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.

[ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यातील उतारे ]

(सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८)

**१.** ** ** ** **

**२.** या अधिनियमात संदरभानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,– व्याख्या.

(क) ते (ड) ** ** ** **

(ढ) "अनिवासी भारतीय (एन आर आय)" याचा अर्थ, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये "सर्वसाधारपणे रहिवासी नसलेली" व्यक्ती असा आहे, आणि त्यामध्ये विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या खंड (ब) अन्वये भारताबाहेर निवास करणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो आणि तसेच त्यामध्ये तिच्या बालकाचा वा पाल्याचाही समावेश होतो;

(ण) ते (म) ** ** ** **

**३.** ते **२६.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५. ]**

**[ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव ( १ ),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.